# ई - पोलीस पत्रिका

दि ०८/११/२०२३ अनु.क्र.२००

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशीमित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्तवतणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्धकठोरकारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१
## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/सिक कालावधी/११७३८/२०२३ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२३**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांच्या आजाराचे कारणास्तव अनुपस्थीत कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६१ नुसार परिवर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोहवा/१०१२, प्रकाश मेश्राम | पो.स्टे. गाडगेनगर | दि.२७/०३/२०२३ ते दि.२७/०६/२०२३ पर्यत ९३ दिवस **परिवर्तीतरजा** मंजुर |

तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहिती देऊन आपल्या येथील सिक रजिस्टर मध्ये तशी नोंद करण्यात यावी.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर कालावधी/पोना-१२९१ कवाडे/११५३८/२०२३अमरावती शहर दि.१७/१०/२०२३**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविल्याप्रामणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असल्याने कसुरी अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. प्राप्त गैरहजर कसुरी अहवालाचे अवलोकन केले असुन कसुरीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक ०६/१०/२०२३ रोजी तुमचे म्हणणे ऐकुण घेण्यासाठी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही तुमचे म्हणणे मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे समक्ष सांगीतले असुन, तुमचे म्हणणे ऐकुण घेतले आहे. परंतु तुम्ही प्रकृतीचे कारण सांगीतले असुन प्रकृतीबाबत कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेले नाही.तरी कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असल्याने तुम्ही कर्तव्यावर गैरहजर राहुन कसुर केलेला आहे.तरी सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव व पदनाम | नेमणुक | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहेकॉ/८४८ राजेश पिसोळे | पो.मुख्या., अम.शहर | दिनांक २५/०६/२०२३ पासुन ते दिनांक ०४/०८/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची सुचना न देता कर्तव्यावरुन गैरहजर राहिले. | दिनांक २५/०६/२०२३ पासुन ते दिनांक ०४/०८/२०२३ पर्यत. | **एकुण ४१ दिवस अर्जित रजा.** |

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/अंतिम आदेश/मपोहवा-१६७ बोडके/११००/२०२३अमरावती शहर दि.१७/१०/२०२३**

## आदेश

**संदर्भ :-** १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १८३८/२०२३, दिनांक ०३/०७/२०२३ अन्वये कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/का.दा.नो./मपोहेकॉ-१६७ बोडके/९०९९/२०२३ अमरावती शहर, दिनांक ०७/०८/२०२३

**कसुरदारचे नाव :-** म.पोहेकॉ/१६७ सुनिता बोडके, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही मपोहेकॉ/१६७ सुनिता बोडके, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची दिनांक २२/०६/२०२३ रोजीचे सकाळी ०८.०० वा. जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती वार्ड क्र. १४ येथे महिला जेल आरोपी सुरक्षा गार्ड डयुटी हि महिला डयुटी मदतगार मपोकॉ/१०८४ संध्या नेहारे यांनी कर्तव्य नेमलेले असता तुम्ही कर्तव्याच्या ठिकाणी रवाना न होता कर्तव्यावरुन गैरहजर राहिल्या. तुमच्या जागी वेळेवर मपोहेकॉ/०५ वंदना केळझरे यांचे कर्तव्य नेमले असुन तुमची गैरहजेरी बाबत स्टेशन डायरी साना क्र. २२/२३, दिनांक २२/०६/२०२३ रोजी चे १२.०० वा. गैरहजेरीची नोंद घेण्यात आलेली आहे. तुम्ही दिनांक २२/०६/२०२३ रोजीचे २०.४० वा. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे गैरहजर मधुन हजर झाल्याने तुम्हाला पुढील कर्तव्याकरीता रापोउपनि श्री शत्रुघ्न हनवते यांनी कर्तव्यावर हजर करुन घेतले आहे. तुमची दिनांक २२/०६/२०२३ रोजी इर्विन जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे महिला डयुटी मदतगार मपोहेकॉ/१०८४ संध्या नेहारे यांनी डयुटी लावले असता सदर कर्तव्याच्या ठिकाणी तुम्ही रवाना न होता महिला डयुटी मदतगार यांचे सोबत शिवीगाळ करुन वाद-विवाद केला आहे. तुम्हाला नेमणु दिलेल्या कर्तव्यावर न जाता व वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिल्या असुन तुम्ही पोलीस विगाभा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या कर्तव्यावर गैरहजर गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. २०००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा

नोटीस तुम्ही दिनांक १०/०८/२०२३ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी तुम्हाला दिनांक ०६/१०/२०२३ रोजी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे म्हणणे ऐकुण घेतले असुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/पोकॉ-तंतरपाळे/११८२६/२०२३अमरावती शहर दि.२६/१०/२०२३**

## आदेश

पोकॉ/१६७० प्रफुल तंतरपाळे हे पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक ०१/१०/२०२३ पासुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असुन दिनांक २३/१०/२०२३ रोजी गैरहजर मधुन कर्तव्यावर हजर होणे करीता आले असता, मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे समक्ष कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे. सदर पोलीस अंमलदार यांनी परस्पर कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केली असल्याने दिनांक ०१/१०/२०२३ पासुन ते दिनांक २३/१०/२०२३ पर्यतचा एकुण २३ दिवस गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## निरंक

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस